**MHAH080002512015**

## <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १७८/२०१५ मधील निशाणी ६० खालील आदेश</u>

१. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरूध्द दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे दि. २९/०१/२०१५ रोजी प्रतिवादी याने वादींचे लाभात लिहुन दिलेले खरेदीखत मे. दुय्यम निबंधक, संगमनेर यांचेकडे नोदवुन देण्याचा हुकूम प्रतिवादींविरुध्द व्हावा यासाठी दाखल केलेला आहे. अर्ज नि. ६० दाखल करून वादीने कथन केले की, वादी आजारी असले कारणाने न्यायालयात हजर राहु शकला नाही व योग्य ती स्टेप्स घेतली गेली नाही. त्यामुळे दिनांक १७.१०.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ५ विरूध्द झालेला 'खारीजचा' रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

२. प्रतिवादी क्र. १ते४ व ६ते८ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून अर्जास विरोध केलेला आहे. वादीचे म्हणणे नुसार वादी न्यायालयात येत नाही तसेच वादी आजारी असल्याचे अर्जात नमूद केलेले असून वैद्यकिय दाखला जोडलेला नाही. सबब अर्ज नामंजुर व्हावा यदाकदाचित मंजुर करावयाचा झाल्यास जबर खर्चाची रक्कम आकारावी.

३. प्रस्तुत अर्जाचे व त्यावरील म्हणणेचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दिनांक १७/१०/२०२२ रोजी दावा खारीज करण्यात आला. प्रस्तुतचा अर्ज

दिनांक २०/०९/२०२५ रोजी दाखल करण्यात आला. वादीने स्वत:चे आजारपणाचे कारण अर्जात नमूद केले आहे. सदर बाब शपथेवर कथन केली आहे. निश्चीतच सदर अर्ज देण्यास विलंब झालेला आहे. परंतू विलंब हा खर्च लादून माफ करता येवू शकतो. त्यामुळे निश्चीतच वादीला एक संधी देणे न्यायोचीत होईल. दिनांक १७/१०/२०२२ रोजीचा आदेश रद्द केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतू दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ५ विरुध्द झालेला आदेश बाजूला सारणे गरजेचे आहे. परिणामी खालील आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

१. अर्ज खर्चाची रक्कम ₹.५,०००/- आकारून मंजुर करण्यात येतो. वादी यांनी खर्चाची रक्कम टी.एल.एस.ए.,संगमनेर यांचेकडे जमा करावी.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. ५ विरुध्द योग्य ती स्टेप्स घ्यावी.

३. सदर आदेशाची उभय पक्षांनी नोंद घ्यावी.

KADUSKAR DEEPALI PARIMAL
Digitally signed by KADUSKAR DEEPALI PARIMAL
Date: 2025.12.20 12:36:57 +0530

दिनांक १८.१२.२०२५
संगमनेर

(श्रीमती डी. पी. कडुस्कर )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
संगमनेर.